# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सिंधुदुर्ग **P.S.(ठाणे):** सिन्धुदुर्गनगरी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0073 **Year (वर्ष):** 2022
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/12/2022 19:08

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भारतीय दंड संहिता १८६० | २७९ |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | ३३७ |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | ३३८ |
| 4 | मोटरवाहन अधिनियम, १९८८ | 184 |
| 5 | मोटरवाहन अधिनियम, १९८८ | ३(१) |
| 6 | मोटरवाहन अधिनियम, १९८८ | 181 |
| 7 | मोटरवाहन अधिनियम, १९८८ | 146 |
| 8 | मोटरवाहन अधिनियम, १९८८ | 196 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार
**Time Period (कालावधी):** पहर 8
**Date From (दिनांक पासून):** 29/10/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/10/2022
**Time From (वेळेपासून):** 22:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 22:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 08/12/2022 **Time (वेळ):** 18:46 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 012
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/12/2022 18:46 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी



Scanned with CamScanner

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कसाल केळुसकरवाडी ,कुडाळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ankush babu naik
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 28/10/1987
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | dodamarg ,shirshing ,dodamarg ,दोड्डामार्ग,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र, 416512,भारत |
| 2 | स्थायी पता | dodamarg ,shirshing ,dodamarg ,दोड्डामार्ग,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र, 416512,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8087809293

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जयवंत बाळकष्ण दाभोलकर | | | 1. रानबांबुळी, कावलेवाडी,कुडाळ, सिन्धुदुर्गनगरी,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी अंकुश बाबु नाईक, वय 35 वर्षे, पोना/488, नेमणुक सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाणे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, मो. नं.8087809293 सरकारतर्फे फिर्याद देतो की,

मी आज सुमारे दोन महीने होतील तेव्हापासुन सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक या पदावर नेमणुकीस आहे. दि. 02.11.2022 रोजी मी पोलीस ठाणेत हजर असताना जा.क्र.4752/2022 अन्वये ठाणे अंमलदार यांनी सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाणे मोटार अपघात रजि.नं.05/2022दाखल करून पुढील कार्यवाहीसाठी मा.प्रभारी अधिकारी यांना रिपोर्ट सादर केला, त्या रिपोर्टवर मा.प्रभारी अधिकारी यांनी आम्हाला चौकशी करण्याबाबत आदेश केला.

सदर अपघातातील खबर पाहता, खबर देणार निधी पांडुरंग पाताडे, वय -54 वर्षे, रा.शिवाजीनगर - कणकवली यांचे सांगणे की, आपले पती पांडुरंग भिकाजी पाताडे हे दिनांक 29/10/2022 रोजी सायंकाळी 04.00 वा.मानाने त्यांची मोटार सायकल नं.MH 07 R 0610 हि घेऊन कुडाळ येथे गेलेले होते. त्यानंतर रात्री 10.30 वा चे मानाने माझ्या पतीच्या फोनवरून कोणीतरी अनोळखी व्यक्तीने माझ्या मुलाच्या फोनवर फोन करून सांगितले की, पांडुरंग भिकाजी पाताडे यांचा कसाल येथील मुंबई- गोवा हायवेवर नलावडे यांच्या घरासमोर मोटार सायकलचा अपघात झाला असुन त्यांच्या छातीला व डोक्याला मार लागल्याने तेथील लोकांनी उपचाराकरीता जिल्हा रुग्णालय सिंधुदुर्ग येथे दाखल केले आहे. त्यानंतर त्यांना तेथुन माझ्या मुलाने कणकवली येथील डॉ. नवरे यांचेजवळ उपचारास नेले व त्यानंतर डॉ. म्हसकर यांचेकडे सीटीस्कॅनसाठी नेले तेथुन त्यांना पुढील उपचाराकरीता गोवा बांबुळी येथे दाखल केले तरी माझे पती यांचे अपघाताकरीता अज्ञात वाहन चालक दाभोलकर (पुर्ण नाव माहीत नाही) हे कारणीभुत आहेत अशी अपघाताची खबर दिली ती खबर दि. 31.10.2022 रोजी 14.56 वा. दाखल करण्यात आलेली आहे.

त्यानंतर सदर अपघाताची चौकशी करण्यासाठी माझेकडे दि. 02.11.2022 रोजी कागदपत्रे दिली. मी साक्षीदार विद्यानंद सुर्यकांत खांदारे, रा. रानबांबुळी यांना बोलावुन घेवुन घटनास्थळी गेलो. तेथे दोन पंच 1) योगेश बाळकृष्ण हिंदळेकर, वय 40 वर्षे, 2) गोपाळ अनंत बांबुळकर, वय 37 वर्षे, दोन्ही रा. रानबांबुळी यांना बोलावुन घेवुन घटनास्थळ पाहीले असता सदरचे घटनास्थळ हे मुंबई गोवा हायवेवरील कसाल केळुसकरवाडी येथील गोवा ते मुंबई जाणा-या लेनवरील आहे. सदर ठिकाणी अपघातातील दोन्ही वाहने त्या ठिकाणी नव्हती. त्या गाड्या सुरक्षिततेसाठी गाडी मालकांच्या नातेवाईकांनी घरी घेवुन गेलेले आहेत, असे साक्षीदार हे सांगत आहेत. सदर घटनास्थळ हे साक्षीदार विद्यानंद सुर्यकांत खांदारे यांनी दाखविले ते पाहता मुंबई गोवा जाणारे महामार्गावरील गोवा ते मुंबई कडील



Scanned with CamScanner

जाणा-या लेनवरील आहे. सदर ठिकाणचा रस्ता सुमारे 30 फुट रुंदीचा सिमेंट कॉंन्क्रेटचा असुन मध्यभागी सहा फुटाचा दुभाजक आहे त्या पलीकडे मुंबई ते गोवा जाणारी सुमारे 30 फुट रुंदीची लेन आहे सदर घटनास्थळावर मोटार सायकल क्र. MH 07 M 1021 ही अपघातात ठोकर लागल्याने ज्या ठिकाणी पडली ती जागा पाहता त्या ठिकाणी त्या गाडीच्या शोचा फायबर तुटुन त्याचे तुकडे पडलेले दिसत असुन रस्त्यावर गाडी घासत गेल्याचे सुमारे 15 फुटाचे मार्क दिसत आहेत व रस्त्याचे शेजारी गवत मळलेले दिसत आहे. त्याच ठिकाणी गाडी पडलेली होती असे साक्षीदार सांगत आहेत. तसेच सदर गाडीपासुन उत्तरेस सुमारे 47 फुट अंतरावर मुंबईकडे जाणा-या लेनवर मो.सायकल नं. MH 07 R 0610 ही पडलेली होती. असे साक्षीदार हे सांगत आहेत सदर ठीकाणची परीस्थिती पाहता घटनास्थळापासुन पुर्वेस सुमारे 150 फुट अंतरावर नलावडे यांचे घर आहे म्हणुन मजकुराचा पंचनामा दिनांक 03.11.2022 रोजी 17.00 ते 17.40 वा. या मुदतीत पंचासमक्ष करण्यात आला.

मोटर सायकल क्र. MH 07 M 1021 वरील चालक जयवंत बाळकृष्ण दाभोलकर, वय 40 वर्षे, रा. रानबांबुळी यांना दि. 02.11.2022 रोजी व मोटार सायकल क्र. MH 07 R 0610 वरील चालक पांडुरंग भिकाजी पाताडे, वय 55 वर्षे, रा. शिवाजीनगर कणकवली, यांना दि. 17.11.2022 रोजी सदर अपघाताची चौकशी चालु असुन सदर चौकशित आपली काही कसुरी दिसुन आल्यास आपलेविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याबाबत मोटार वाहन कायदा कलम 209 प्रमाणे नोटीस देण्यात आली.

सदर अपघातातील मोटार सायकल क्र. MH 07 M 1021 या वाहनाचा दि. 04.11.2022 रोजी पंचासमक्ष पंचनामा करण्यात आला तसेच दुसरे अपघातग्रस्त वाहन मोटार सायकल क्र .MH 07 R 0610 या वाहनाचा दि. 13.11.2022 रोजी पंचासमक्ष पंचनामा करण्यात आला. सदर दोन्ही पंचनाम्यामध्ये वाहनांचे नुकसान झाल्याचे दिसत आहे.

सदर अपघातातील जखमी इसम जयवंत बाळकृष्ण दाभोलकर यांनी जिल्हा रूग्णालय, सिंधुदुर्ग येथे उपचार घेतले त्या ठिकाणच्या डॉंक्टरांनी दुखापतीबाबतच्या सर्टीफिकेट दिले. त्यात त्यांना किरकोळ दुखापती झाल्याचे नमुद आहे. तसेच पांडुरंग भिकाजी पाताडे यांनीही जिल्हा रूग्णालय, सिंधुदुर्ग येथे उपचार घेतले त्याबाबत वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेल्या सर्टिफिकेटवर त्यांना गंभीर दुखापती झाल्याचे नमुद केलेले आहे.

सदर अपघातातील साक्षीदार पांडुरंग भिकाजी पाताडे वय 55 वर्षे रा.कणकवली शिवाजीनगर यांचेकडे दि. 17.11.2022 रोजी चौकशी करता त्यांनी सांगितले की, मी दि.29.10.2022 ते दि. 09.11.2022रोजी दरम्याने रूग्णालयात उपचारासाठी दाखल होतो व सदर कालावधीत मी पुर्ण शुद्धीत नव्हतो. तसेच सध्या मी उपचार घेवुन घरी आल्यानंतर पूर्ण शुद्धीत असुन दि. 29/10/2022 रोजी रात्रौ 10.00 वा. चे. सुमारास मुंबई-गोवा हायवेवरील गोवा ते मुंबई जाणा-या लेनवर केळुसकरवाडी-कसाल येथील नलावडे यांचे घरासमोर मी माझ्या ताब्यातील MH-07-R-0610 ही मोटार सायकल घेवुन कणकवलीच्या दिशेने जात असताना समोरुन विरुद्ध दिशेने येणा-या जयवंत बाळकृष्ण दाभोलकर रा. रानबांबुळी यांनी त्यांचे ताब्यातील मोटारसायकल क्र MH-07-M-1021 ने माझ्या ताब्यातील मोटारसायकलीस ठोकर देवुन अपघात करुन स्वत:चे व माझे दुखापतीस कारणीभुत झालेले आहेत. तसेच त्यांचा मुलगा साक्षीदार क्षितीश पांडुरंग पाताडे वय-20 वर्षे रा. शिवाजीनगर कणकवली यांचेकडे दि. 19/11/2022 रोजी अपघाताची चौकशी करता तो अपघाताबाबत वरीलप्रमाणे सांगत आहे. त्यानंतर साक्षीदार 1. विद्यानंद सुर्यकांत खांदारे वय-30 वर्षे रा. रानबांबुळी यांचेकडे दि. 20/11/2022 रोजी व साक्षीदार 2. विशाल सुरेश दाभोळकर वय-28 वर्षे रा. रानबांबुळी यांचेकडे दि. 30/11/2022 रोजी चौकशी करता, ते दोघेही एकाच मोटार सायकलने दि.29/10/2022 रोजी कसाल बाजारपेठेत औषधे आणण्यासाठी गेलेले होते ते आपल्या मोटरसायकल ने परत येत असता 10.00 वा.चे मानाने केळुसकरवाडी कसाल या ठिकाणी आल्यावर त्यांना गोवा ते मुंबईकडे जाणा-या लेनवर गाडी ठोकरल्याचा आवाज झाला म्हणुन ते आपली गाडी थांबवुन अपघात घडलेल्या ठिकाणी गेले असता त्या ठिकाणी MH-07-R-0610 ही मोटारसायकल मधोमध पडुन गाडीचे नुकसान झाल्याचे व त्यावरील चालकही रस्त्याच्या बाजुस बसलेला असल्याचे व दुसरी मोटारसायकल नं. MH-07-M-1021 ही रस्त्याच्या कडेला गवतात पडलेली असल्याचे व त्यावरील रस्त्याच्या कडेला बसलेल्या चालकाबाबत खात्री केली असता तो आपला चुलत भाऊ जयवंत बाळकृष्ण दाभोलकर असल्याचे दिसले असे वर नमुद साक्षीदार विशाल सुरेश दाभोळकर यांनी सांगितले. त्यानंतर सदर दोन्ही साक्षीदार यांनी पांडुरंग भिकाजी पाताडे यांच्या नाकातुन व कानातुन रक्त येत असल्याचे सांगुन अपघातातील दोन्ही इसमांना दुखापती झाल्याने त्यांना एम्बुलन्स बोलावुन घेवुन त्यात बसवुन जिल्हा रुग्णालय येथे पाठविले. असे सांगितले तसेच दि.29/10/2022 रोजी जिल्हा रुग्णालय सिंधुदुर्ग यांचेकडे जखमी इसम जयवंत बाळकृष्ण दाभोलकर हे उपचारास दाखल झाल्याने तेथील डॉक्टरांनी सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाणे MLC असल्याचे कळविले वरुन व्ही.एम.जाधव पोकॉ/520 यांनी जयवंत बाळकृष्ण दाभोलकर यांचेकडे चौकशी केली असता दि.29/10/2022 रोजी आपण कसाल बालमवाडी येथे



Scanned with CamScanner

आपल्या मित्रास भेटण्यासाठी मोटारसायकल नं. MH-07-M-1021 वरुन गेलो होतो. मित्र न भेटल्यामुळे मी परत गोवा ते मुंबईकडे जाणा-या लेनवरुन विरुद्ध दिशेने माझे घरी रानबांबुळी येथे जात असताना रात्रौ 10.05 वा. चे दरम्याने कसाल केळुसकरवाडी येथे नलावडे यांचे घरासमोर गोव्यावरुन मुंबईकडे जाणा-या महामार्गावर समोरुन येणा-या मोटार सायकलची व माझ्या मोटार सायकलची धडक झाली त्यामुळे मी हायवेच्या एका बाजुला रस्त्यावर खाली पडलो व माझ्या पायाचे पंजास, डाव्या पायाचे अंगठ्यास खरचटले व हाताचे बोटांना गुडघ्यास दुखापत झाली तसेच समोरील इसमालाही दुखापत झाली. आम्हा दोघांनाही तेथील जमलेल्या लोकांनी उपचारासाठी जिल्हा रुग्णालय सिंधुदुर्ग ओरोस येथे आणले आहे असे सांगत आहेत. तसेच सदर अपघाताच्या चौकशी दरम्यान जयवंत बाळकृष्ण दाभोलकर यांचेकडे ड्रायव्हींग लायसन्स बाबत विचारणा केली असता आपण ड्रायव्हींग लायसन्स काढलेले नाही व गाडीचा विमा संपलेला असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

एकंदरीत सदर अपघाताची चौकशी करता यातील जयवंत बाळकृष्ण दाभोलकर , वय 40 वर्षे, रा. रानबांबुळी कावलेवाडी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग यांनी आपले ताब्यातील मोटार सायकल क्र. MH 07 M 1021 ही ड्रायव्हींग लायसन्स नसताना, गाडीचा विमा संपलेला असताना, गोवा ते मुंबई असा जाणारा एकतर्फि मार्ग असताना, विरुद्ध दिशेने, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने, अविचाराने व बेदरकारपणे कसाल बालमवाडी ते रानबांबुळीकडे चालवित घेवुन जात असताना दि. 29.10.2022 रोजी 22.00 वा. चे दरम्याने मुंबई- गोवा महामार्गावर कसाल-केळुसरकरवाडी या ठिकाणी कुडाळ ते कणकवलीकडे जाणारी मोटार सायकल क्र MH 07 R 0610 वरील चालक पांडुरंग भिकाजी पाताडे , वय 55 वर्षे, रा.शिवाजीनगर -कणकवली यांचे मोटार सायकलला ठोकर देऊन अपघात करुन अपघातामध्ये स्वताचे किरकोळ दुखापतीस तसेच पांडुरंग भिकाजी पाताडे यांचे गंभीर दुखापतीस कारणीभुत झाला असल्याने जयवंत बाळकृष्ण दाभोलकर, वय 40 वर्षे, रा. कावलेवाडी - रानबांबुळी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग याचेविरुद्ध भा.द.वि. कलम 279, 337, 338, मोटार वाहन कायदा कलम 184, 3 (1) 181, 146/196 प्रमाणे माझी कायदेशीर फिर्यादि आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
ankush babu naik
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): 488
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** hemant wittal deon
**Rank(पद):** II (Inspector)
**No.(सं.):**



Scanned with CamScanner